# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २२/०३/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

### अवैध्यरीत्या अंमली पदार्थ गांजा बाळगून विक्री करिता घेउन जाणाऱ्या आरोपीतांवर कायदेशिर कार्यवाही

दिनांक २१/०३/२०२४ चे १६/०० वाजता दरम्यान रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक राकेश साखरकर ठाणेदार पोलीस स्टेशन केळवद व त्यांच्या पोलीस स्टॉफनि मुखबिरद्वारे मिळालेल्या खबरे वरुन छिंदवाडा कडुन नागपुर कडे जाणाऱ्या हायवे वरील मौजा आर. टी. ओ. चेकपोस्ट खिंड बॉर्डर केळवद येथे नाकाबंदी करीत असताना मिळालेल्या माहिती प्रमाणे VERMA ट्रॅव्हल्स क्र. एम. पी.–२८/झेड डी– ७३१९ मधील प्रवाशी नामे–**१) महिला आरोपी २) बसंत अशोक गोहे, वय ३० वर्ष रा. मोरखा तह. आमला जि. बैतुल (एम.पी)** यांनी त्यांचे ताब्यातील एका निळया रंगाचे बँगमध्ये निळया पिवळया रंगाचे फुलांचे चादरमध्ये पॉलीथीनमध्ये गुंगीकारक वनस्पती ओलसर दमट गांजा ज्यामध्ये ४.७९५ ग्रॅम (४ किलो ७९५ ग्रॅम गांजा पॉलिथीनसह व निळया रंगाचे बॅगसह वजन ६.९३५ ग्रॅम सह एकुण ६ किलो ९३५ ग्रॅम तसेच चादरसहित ५.२७० गांजा १०,०००/– रू. प्रती किलो प्रमाणे असा एकुण ४७,९५०/– रू. चा मुद्देमाल बाळगुन वाहतुक करताना मिळुन आल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करुन सदर VERMA ट्रॅव्हल्स क्र. एम. पी.– २८/ झेड डी– ७३१९ मधील प्रवाशी नामे–**१) महिला आरोपी २) बसंत अशोक गोहे, वय ३० वर्ष रा. मोरखा तह. आमला जि. बैतुल (एम.पी)** या दोन्ही इसमांविरुद्ध कलम–२०, २२ एन. डी. पी. एस. ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. श्री. अनिल मस्के उप विभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि राकेश साखरकर ठाणेदार पो.स्टे केळवद, स. फौ. नरेश बरखडे, पोहवा मोरेश्वर चलपे, मपोहवा किरण भगत, पोशि सचिन सलामे, पोशि धोंडुतात्या देवकत्ते, चापोहवा गुणवंता डाखोळे, पोशि अर्णव भांगे, पोशि पंकज शहारे, पोशि पंकज कोहाड यांनी केली आहे.

### नागपूर ग्रामीण पोलीसांचा रूटमार्च

पोलीस स्टेशन वेलतुर अंतर्गत दिनांक २१/०३/२०२४ रोजी चे १५/०० वा. ते १६/०० वा. पर्यंत आगामी लोकसभा निवडणूक –२०२४ संबंधाने व आगामी सण उत्सव होळी, शिवजयंती संबंधाने वेलतुर टाऊन व मेंढाकला येथे सपोनी. सतीश पाटील, ठाणेदार वेलतुर यांचे मार्गदर्शनात रूटमार्च घेण्यात आला. रूट मार्च दरम्यान पोस्टे. वेलतुर येथील ०२ अधिकारी, ०९ अंमलदार, ०८ होम सैनिक, तसेच RPF चे ०१ अधिकारी १८ कर्मचारी हजर होते.

दिनांक २२/०३/२०२४ रोजी ११/०० वाजता पासून ते १३/०० वा. पर्यंत श्री उमेश पाटील पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन यांचा उपस्थितीत सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ संबंधाने पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत कांद्री, खदान नं ३, टेकाडी येथे रूट मार्च घेण्यात आला. सदर रूट मार्चमध्ये ०६ अधिकारी, २१ RPF अंमलदार, ११ अंमलदार व १४ होमगार्ड उपस्थित होते.








पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर